# प्रेसनोट

नाशिक,
दिनांक : ११/०१/२०१८

**आलोसे शामराव महादेव शेटे, सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक कार्यालय अंधेरी, मुंबई व त्यांची पत्नी शर्मिला शामराव शेटे यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यान्वये अपसंपदा संपादित केल्याचा गुन्हा दाखल केले बाबत.**

---

यातील आलोसे शामराव महादेव शेटे, सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक कार्यालय अंधेरी, मुंबई यांनी नाशिक शहर व इतरत्र शासकिय सेवेत कार्यरत असतांना आपल्या पदाचा दुरुपयोग करुन अवैध भ्रष्ट मार्गाने उत्पन्नाचे स्त्रातोपेक्षा ६९,१७,२२८/–रुपयांची म्हणजेच ७०.९१ % एवढी अपसंपदा स्वत:च्या व पत्नी शर्मिला शामराव शेटे यांच्या नावे संपादित करुन धारण केल्याचे लाचलुचपत प्रतिबंधक पथक नाशिक विभागाने केलेल्या चौकशीअंती अपसंपदा निष्पन्न झाल्याने त्यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम सन १९८८ चे कलम १३(१) (इ) सह १३(२) व भा.द.वि. कायदा कलम १०९ प्रमाणे आज दि. ११/०१/२०१८ रोजी सरकारवाडा पोलीस ठाणे नाशिक शहर येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक तर्फे नागरीकांना आवाहन करण्यांत येते की, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी शासकीय अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांचे वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील तर कृपया लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्रातील कार्यालयाशी संपर्क साधुन निर्भिडपणे या कार्यालयाकडे तक्रार नोंदवावी.

कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे कार्यप्रणाली बाबत वा तक्रारीबाबत माहिती पाहिजे असल्यास खालील मोबाईल क्रमांक व दूरध्वनीवर संपर्क साधावा महाराष्ट्रातील सर्व जनतेच्या सोईच्या दृष्टीने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार करण्यासाठी **लॅंडलाईन ते लॅंडलाईन व मोबाईल ते लॅन्डलाईन अशी टोल फ्री नंबर १०६४** ची सेवा सुरु करण्यांत आली असुन सदर क्रमांकावर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे कार्यप्रणालीसंबंधी व करावयाच्या तक्रारीसंबंधी नागरीकांनी संपर्क साधावा.

| अनं | युनिटचे नांव | दूरध्वनी क्रमांक | **टोल फ्री नंबर** |
|---|---|---|---|
| १ | नाशिक | ०२५३–२५७५६२८, २५७८२३० | **१०६४** |
| २ | अहमदनगर | ०२४१–२४२३६७७ | **१०६४** |
| ३ | धुळे | ०२५६२–२३४०२० | **१०६४** |
| ४ | नंदूरबार | ०२५६४–२३०००९ | **१०६४** |
| ५ | जळगांव | ०२५७–२२३५४७७ | **१०६४** |

वाचक पोलीस उपअधीक्षक
पोलीस अधीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
नाशिक परिक्षेत्र, नाशिक करीता